0001

# नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-**

१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून तसेच वरिष्ठ पोलिस निरिक्षक, शिवडी पोलिस ठाणे यांचेकडून दिनांक ०८/१२/२०११ रोजी प्राप्त झालेले अहवाल व त्यासोबतचे कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.८६/२०११/ज़ा.१०१३ दिनांक १३/१२/२०११.

३) मे. अपार इंडस्ट्रिजचे मालक, कैनाझ असोसिएटचे मालक, टँकर क्र. एमएच-०४-डीके-६३७० चे मालक मनोज भगवानदास वाल्मिकी, टँकर क्र. एमएच-०४-डीके-६३७० चे चालक अब्दुल साजिद व अरविंद रामजी शहा यांचे दिनांक २७/१२/२०११ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.

४) टँकर क्र. एमएच-०४-डीके-६३७० चे चालक अब्दुल साजिद व मुर्तूजा अली रमजान अली शेख यांचे दिनांक २७/१२/२०११ रोजी नोंदविण्यात आलेला संयुक्त लेखी जबाब.

५) या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून दिनांक ११/०४/२०१२ व वरिष्ठ पोलिस निरिक्षक, शिवडी पोलिस ठाणे यांचेकडून दिनांक १२/०४/२०१२ रोजी न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, कालिना यांचा प्राप्त रासायनिक पृथःकरण अहवाल.

६) या कार्यालयाचे संचालक, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांना दिनांक १९/०४/२०१२ रोजी निर्गमित केलेले पत्र.

७) संचालक, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांचकडून दिनांक १३/०६/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.८६/२०११/जा. ४३४
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : २८/०६/२०१२.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक २८/११/२०११ रोजी या कार्यालयाच्या फिरते पथकातील अधिकारी/कर्मचारी शिवडी गाडी अड्डा पोलिस चौकी येथे जाऊन तेथे उपस्थित असलेले पोलिस नाईक श्री. दिलावर अब्बास शेख बक्कल क्र. २५८२८ यांची भेट घेऊन त्यांना शिवडी गाडी अड्डा येथे पेट्रोलजन्य पदार्थाची चोरी होणार असल्याबाबत खात्रीलायक

माहितीनुसार तेथे जाऊन कारवाई करावयाची असल्याचे सांगितले. त्यानुसार पथकातील अधिकारी/कर्मचारी व पोलिस नाईक श्री. दिलावर अब्बास शेख यांचेसह शासकीय व खाजगी वाहनाने शिवडी गाडी अड्डा इलेक्ट्रीक पोल क्रमांक एस.एम.ए. १० येथे जाऊन ज्या ठिकाणी चोरी होणार आहे ते ठिकाण दुरुन दिसेल अशा आडोशाच्या जागी उभे राहिले. काही वेळाने टँकर क्र. एमएच-०४-डीके-६३७० या टँकरच्या दिशेने एक सायकलवाला इसम सायकलला ३ ड्रम अंदाजे ३५ लि. क्षमतेचे पांढऱ्या रंगाचे कॅन अडकविलेल्या स्थितीत घेऊन वरील नमूद क्रमांकाच्या टँकरजवळ उभा राहिला. त्यानंतर दुसरा एक इसम सदर टँकरजवळ येऊन टँकरच्या मागील बाजूस असलेल्या नॉबला एका लोखंडी टँप सदृश्य वस्तू लावून सदरचा नॉब उघडून सदर टँकरमधून पेट्रोलियम सदृश्य पदार्थ त्यांच्याकडील रिकाम्या असलेल्या ३५ लि. क्षमतेच्या कॅनमध्ये काढावयास सुरुवात केली. त्यावेळी सदर इसमाने ३५ लि. क्षमतेचे दोन कॅन पेट्रोलियम सदृश्य पदार्थ भरुन घेतले व तिसऱ्या कॅनमध्ये पेट्रोलजन्य पदार्थ भरत असतांना पथकातील अधिकाऱ्यांनी पंचासमवेत सदर एका इसमास रंगेहाथ पकडले व ताब्यात घेतले. सदरहू इसमास त्याचे नांव विचारले असता, त्याने त्याचे नांव मुर्तूजा रमजान अली शेख असे सांगून रोजंदारी कामगार म्हणून काम करीत असल्याचे सांगितले.

ताब्यात घेतलेल्या इसमाकडे अधिक चौकशी केली असता, टँकर क्र. एमएच-०४-डीके-६३७० चा चालक कारवाईच्या वेळी अधिकाऱ्यांची नजर चुकवून पसार झाला. ताब्यात घेतलेला इसम मुर्तूजा शेख यास सदर टँकर कोणाच्या मालकीचा आहे, तसेच चोरी केलेला पेट्रोलजन्य पदार्थ कशाकरिता व कोणत्या कामाकरिता वापरात आणणार असल्याबाबत विचारणा केली असता, वर नमूद टँकरच्या मालकीबाबत तो काहीही सांगू शकला नाही. तथापी, चोरुन काढलेला पेट्रोलजन्य पदार्थ हा हरुन नामक व्यक्तीने त्याला सांगितल्यानुसार सदरचे काम केले असल्याचे त्याने पंचासमक्ष सांगितले.

टँकर क्र. एमएच-०४-डीके-६३७० मधील पेट्रोल सदृश्य पदार्थ कोणता व काय आहे, याबद्दल ताब्यात घेतलेल्या इसमाकडे विचारपुस केली असता, तो काहीही माहिती देऊ न शकल्यामुळे सदरहू टँकरच्या चालकाच्या केबिनची झडती पथकाने पंचासमवेत घेतली असता, सदरचा टँकर कैनाझ असोसिएट, जुनी ओरिएंटल इमारत, पहिला मजला, ६५, एम.जी. रोड, फ्लोरा फाऊटन, मुंबई यांचे सी नोट ८४८७ दिनांक २८/११/२०११ अपार इंडस्ट्रिज रबाळे यांना दिलेली आढळून आले. त्यामध्ये सदरचा पेट्रोलजन्य पदार्थ हे बेस ऑईल ७ ऑन असे नमूद केल्याचे आढळून आले. तसेच सदरच्या सी नोटमध्ये टँकर क्र. एमएच-०४-डीके-६३७० हा २६ किलो लिटर

HEAD OFFICE

क्षमतेचा असल्याचे नमूद केले असून सी नोट मध्ये नमूद केलेले पेट्रोलजन्य पदार्थ म्हणजे बेस ऑईल ७ ऑन हे नेट वेट १६९५० कि.लि. असल्याचे आढळून आले.

अशाप्रकारे इसम नामे मुर्तूजा अली शेख याने टँकर क्र. एमएच-०४-डीके-६३७० वरील चालकाशी संगणमत करुन नमूद मो/टँकरमधून जीवनावश्यक वस्तू असलेल्या बेस ऑईलची लबाडीच्या इराद्याने चोरी केल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द (१) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ (२) दि पेट्रोलियम प्रोडक्टस् (मेटेंनन्स ऑफ प्रॉडक्शन स्टोरेज ॲण्ड सप्लाय) ऑर्डर, १९९९ चे कलम ३, ४, ५, ६, ७ तसेच (३) भा.दं.वि. चे कलम ३७९, ३४ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द शिवडी पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. १०९/२०११, दि.२८/११/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | टँकर क्र. एमएच-०४-डीके-६३७० | १ नग | १२,००,०००/- |
| २ | उक्त टँकरमधील पेट्रोलजन्य पदार्थ (बेस ऑईल ७ ऑन) | १६८८० लि. | ११,१४,०८०/- |
| ३ | दोन ३५ लि. क्षमतेचे पेट्रोलजन्य पदार्थ (बेस ऑईल ७ ऑन) ने भरलेले ड्रम | ७० लि. | ४,६२०/- |
| ४ | सायकल | १ नग | १,५००/- |
| ५ | रिकामा ३५ लि. क्षमतेचा कॅन | १ नग | १००/- |
| ६ | लोखंडी टॅप | १ नग | ५००/- |
| ७ | लोखंडी हूक | २ नग | १००/- |
| | | एकूण | २३,२०,९००/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई व वरिष्ठ पोलिस निरिक्षक, शिवडी पोलिस ठाणे, मुंबई यांनी केलेली आहे. सबब, शिवडी पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. १०९/२०११, दि.२८/११/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेला उपरोक्त मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये ? याबाबत वाचा क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली असून त्याकरीता या कार्यालयात दिनांक २७/१२/२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक २७/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस मे. अपार इंडस्ट्रिजचे आयात व्यवस्थापक श्री. सी. पिंटो, कैनाझ असोसिएट या वाहतूकदार यांचे वतीने व्यवस्थापक श्री. गणेश शर्मा, टँकर क्र. एमएच-०४-डीके-६३७० चे

मालक मनोज भगवानदास वाल्मिकी, टँकर क्र. एमएच-०४-डीके-६३७० चे चालक अब्दुल साजिद, मुर्तूजा रमजान अली शेख व अरविंद रामजी शहा हे उपस्थित राहिले. मुर्तूजा रमजान अली शेख वगळता सर्वांनी त्यांचे स्वतंत्र लेखी निवेदन वाचावे क्र. ३ अन्वये सादर केले. तसेच टँकर क्र. एमएच-०४-डीके-६३७० चे चालक अब्दुल साजिद व मुर्तूजा अली रमजान अली शेख यांचा वाचावे क्र. ४ अन्वये संयुक्त लेखी जबाब नोंदविण्यात आला.

तद्नंतर वाचावे क्र. ५ अन्वये प्राप्त झालेल्या जप्त मुद्देमालाच्या रासायनिक पृथ:करण अहवालात, Exhibit nos. 1 and 2 contain high boiling petroleum hydrocarbon oil having flash point 180 °C and density 0.820 (at 25 °C) असे नमूद केले आहे. तथापी, प्रस्तुत प्रकरणी बिल ऑफ एन्ट्रीवरील नमूद Transformer Oil Base Stock 70 N व पृथ:करण अहवालामधील high boiling petroleum hydrocarbon oil हे दोन्ही द्रवपदार्थ वेगळे असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत असल्याने दोन्ही पदार्थाचे Definition व दोन्ही पदार्थामधील फरक याबाबतचा अहवाल प्राप्त करुन घेण्यासाठी संचालक, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांना वाचावे क्र. ६ अन्वये पत्र निर्गमित करण्यात आले.

तद्नंतर संचालक, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांच्याकडून वाचावे क्र. ७ अन्वये प्राप्त झालेल्या अहवालात, This to inform you that the report issued by this office says that "exhibit nos. 1 and 2 contain high boiling petroleum hydrocarbon oil having flash point 180 °C and density 0.820 (at 25 °C)" This oils may be used as Transformer oil base stock असे नमूद केले आहे.

सबब, सदरचे प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

युक्तीवाद :-

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, शिवडी पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक ०५/१२/२०११ रोजीच्या लेखी अभिवेदनात, सदर गुन्ह्यात अटक करण्यात आलेल्या इसमाने अटके दरम्यान मो/टँकर यांच्याशी संगनमत करुन गुन्हा केल्याचे कबुल केले आहे. तरी सदर गुन्ह्यात जप्त केलेले बेस ऑईल १६,८८० लिटर हे ज्वलनशिल असल्याने विल्हेवाट लावण्याची तात्काळ आदेश होणेस विनंती आहे, असे नमूद केले आहे.

दिनांक २७/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. अपार इंडस्ट्रिजचे आयात व्यवस्थापक श्री. सी. पिंटो यांनी कंपनीच्या वतीने सादर केलेल्या लेखी निवेदनात, ते रबाळे नवी मुंबई स्थित फॅक्टरीमध्ये वापर करण्याकरिता बेस आईल ७ हा परदेशातून आयात करीत असल्याचे सांगितले. त्याकरिता कंपनीच्या वतीने मे.

कैनाझ असोसिएट यांना डॉक्समधून साठ्याचे क्लिअरिंग तसेच सदर साठा हा उपभोक्त्यांकडे वितरण करण्याकरिता वाहतूकदार म्हणून नेमल्याचे नमूद केले आहे. माहे नोव्हेंबर २०११ मध्ये त्यांच्या कंपनीने आयात केलेला बेस ऑईल ७ चा साठ्याची आवक दिनांक २८/११/२०११ रोजी डॉकमध्ये झाली. पूर्वी नमूद केल्याप्रमाणे त्यांनी मे. कैनाझ असोसिएट यांना सदर कार्गोचे क्लिअरिंग आणि वाहतूक करुन त्यांच्या रबाळे येथील फॅक्टरीमध्ये आणण्याकरिता निर्देशित केले. सदर साठ्याचे आयात संबंधीचे कागदपत्रे सादर केली असून यावरुन सदरचा साठा हा त्यांच्या मालकीचा असल्याचे नमूद केले आहे. आयात केलेला साठा त्यांच्या फॅक्टरीवर न पोहचल्याने त्यांनी चौकशी केली असता, नमूद टँकर हा आयात केलेल्या साठ्यासहित संबंधित प्राधिकरणाने टँकरचा चालक हा अनधिकृतरित्या त्यामधील साठा काढीत असल्याच्या सबबीवरुन जप्त केला असल्याचे आढळून आले. सदर टँकरचा चालक अथवा टँकरचा मालक अथवा सब कॉन्ट्रॅक्टर यांना वाहतूकीस नेमले असल्याने त्यांच्या चालकाकडून करण्यात आलेल्या गुन्ह्यामध्ये त्यांच्या कंपनीचा काहीही संबंध नसल्याचे नमूद केले आहे. जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे उल्लघंन झाले असल्यास कलम ६ अन्वये मुद्देमाल जप्त करण्याची तरतूद आहे. तथापी, त्यांच्या कंपनीकडून या कलमाचा कोणताही भंग झाला नसल्याचे नमूद केले आहे. सबब, संबंधित प्राधिकरणाने जप्त केलेला त्यांचा १६८८० लिटर बेस ऑईल ७ ऑनचा साठा हा त्यांना सामान्य अटीवर परत करण्यात यावा, असे नमूद केले आहे.

दिनांक २७/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित कैनाझ असोसिएटचे मालक यांचे वतीने व्यवस्थापक श्री. गणेश शर्मा यांनी सादर केलेल्या लेखी निवेदनात, त्यांचा कार्गोच्या क्लिअरिंग ॲण्ड फॉरवर्डींग तसेच वाहतूकीचा व्यवसाय असून माहे नोव्हेंबर २०११ मध्ये त्यांच्यावर मे. अपार इंडस्ट्रिज यांचा परदेशातून आयात केलेला बेस ऑईल ७ ऑनच्या साठ्याचे क्लिअरिंग व सदर साठा कंपनीचे रबाळे, नवी मुंबई येथील फॅक्टरी येथे वाहतूक करुन पोहच करण्याची जबाबदारी आहे. त्याप्रमाणे सदरचा आयात केलेला साठा हा डॉकमधील सर्व प्रक्रियेची पूर्तता करण्यात आल्यानंतर त्यांच्याकडे गरजेनुसार टँकर पुरेसे उपलब्ध नसल्याने त्यांनी सदर साठ्याच्या वाहतूकीसाठी सब कॉन्ट्रॅक्टर म्हणून अरविंद रामजी शहा यांची नेमणूक केली आहे. तद्नंतर सदरचा साठा हा नियोजित ठिकाणी न पोहचल्याने चौकशी केली असता, नमूद टँकर हा आयात केलेल्या साठ्यासहित संबंधित प्राधिकरणाने टँकरचा चालक हा अनधिकृतरित्या त्यामधील साठा काढीत असल्याच्या सबबीवरुन जप्त केला असल्याचे आढळून आले. सदर टँकरचा चालक अथवा टँकरचा मालक अथवा सब कॉन्ट्रॅक्टर अरविंद रामजी शहा यांना वाहतूकीस नेमले असल्याने त्यांच्या चालकाकडून करण्यात आलेल्या गुन्ह्यामध्ये त्यांच्या कंपनीचा काहीही संबंध नसल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे सब कॉन्ट्रॅक्टर यांनी नेमलेल्या टँकरच्या चालकाने केलेल्या गुन्ह्यात त्यांना

जबाबदार न धरण्यात येऊ नये. तसेच त्यांचा टँकरचा चालक अथवा मालक यांच्याशी कोणताही करारनामा केलेला नाही. त्यांची कंपनी क्लिअरिंग ॲण्ड फॉरवर्डींग एजन्ट तसेच वाहतूक ठेकेदार असल्याने सदरचा साठा नियोजित ठिकाणी उपभोक्त्यांस पोहच करण्याची त्यांची नैतिक जबाबदारी आहे. सबब, जप्त करण्यात आलेला १६८८० लिटर बेस ऑईल ७ ऑनचा साठा हा मे. अपार इंडस्ट्रिज यांना परत करण्यास त्यांची काहीही हरकत नाही, असे नमूद केले आहे.

दिनांक २७/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित अरविंद रामजी शहा यांनी युक्तीवाद केला की, त्याचा पेट्रोलियम पदार्थाच्या वाहतूकीसाठी ट्रान्सपोर्ट कॉन्ट्रॅक्टर म्हणून व्यवसाय असून दिनांक २८/११/२०११ रोजी मे. कैनाझ असोसिएट यांनी बेस ऑईल ७ ऑनच्या साठ्याची डॉक्समधून टँकरद्वारे उचल करुन मे. अपार इंडस्ट्रिज यांचे रबाळे येथील फॅक्टरीवर पोहच करण्यासाठी सब कॉन्ट्रॅक्टर म्हणून त्यांना नेमले असता, त्यांनी मनोज भगवानदास वाल्मिकी यांचे टँकर क्र. एमएच-०४-डीके-६३७० हे वाहतूकीसाठी नेमणूक केली असता सदर टँकर मालकाने त्यांचा नमूद टँकर डॉक्समध्ये पाठवून साठा भरुन घेतला होता. तद्नंतर सदरचा साठा हा नियोजित ठिकाणी न पोहचल्याने चौकशी केली असता, नमूद टँकर हा आयात केलेल्या साठ्यासहित संबंधित प्राधिकरणाने टँकरचा चालक हा अनधिकृतरित्या त्यामधील साठा काढीत असल्याच्या सबबीवरुन जप्त केला असल्याचे आढळून आले. सदर टँकरचा चालक हा त्यांचा नोकर नसून तो टँकर मालक मनोज वाल्मिकी यांचा नोकर असल्याने याबाबत त्यांचा काहीही संबंध नाही. त्यामुळे टँकर चालकाची नेमणूक टँकर मालकाने केली असल्याने त्यांना नमूद गुन्ह्यात जबाबदार धरण्यात येऊ नये. तसेच कोणत्याही प्रकारे त्यांची ट्रान्सपोर्ट कॉन्ट्रॅक्टर म्हणून साठा नियोजित ठिकाणी वाहतूक करुन पोहच करण्याची जबाबदारी आहे. सबब, टँकर क्र. एमएच-०४-डीके-६३७० मधील १६८८० लिटर बेस ऑईल ७ ऑनचा साठा हा मे. अपार इंडस्ट्रिज यांना परत करण्यास तसेच जप्त करण्यात आलेला सदरचा टँकरही त्यांचे मालक मनोज वाल्मिकी यांना परत करण्यास त्यांची काहीही हरकत नाही, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २७/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित टँकर क्र. एमएच-०४-डीके-६३७० चे मालक मनोज भगवानदास वाल्मिकी यांनी युक्तीवाद केला की, सदर टँकर संबंधिचे सर्व कागदपत्रे त्यांच्या नांवे असून त्यांचा टँकर भाड्याने वाहतूकीस देण्याचा व्यवसाय आहे. दिनांक २८/११/२०११ रोजी श्री. अरविंद रामजी शहा यांनी मे. अपार इंडस्ट्रिज यांचा साठा टँकरद्वारे डॉक्समधून भरुन तो रबाळे येथे फॅक्टरीमध्ये पोहच करण्यासाठी करारबध्द केले होते. त्यानुसार त्यांनी त्यांचे चालक यांना डॉकमध्ये जाऊन टँकरद्वारे साठ्याची उचल करण्याचे निर्देशित केले

असता, त्याने त्याप्रमाणे टँकरच्या चालकाने सदरचा साठा भरुन नियोजित ठिकाणी जाण्यासाठी प्रयाण केले. तद्नंतर सदरचा साठा हा नियोजित ठिकाणी न पोहचल्याने चौकशी केली असता, नमूद टँकर हा आयात केलेल्या साठ्यासहित संबंधित प्राधिकरणाने त्यांच्या टँकरच्या चालकास अनधिकृतरित्या टँकरमधील साठा काढीत असल्याच्या सबबीवरुन जप्त केला असल्याचे आढळून आले. त्यामुळे नमूद गुन्ह्यात टँकर मालक म्हणून त्यांना जबाबदार धरु नये. माननिय सर्वोच्च न्यायालय येथील सीआर.एल.जे. १३४१ या प्रकरणी वाहन मालकाचा गुन्ह्यामध्ये सहभाग नसल्यास त्याचे वाहन जप्त करता येणार नाही, असे नमूद असल्याने त्यांचाही नमूद गुन्ह्यात प्रत्यक्ष सहभाग नसून व त्यांचा चालक हा नियोजित ठिकाणी जाण्यासाठी मार्गस्त झाल्यानंतर त्याचा चालकावर नियंत्रण राहत नाही. सद्य:स्थितीत त्याचा टँकर हा पोलिस ठाणे येथे जप्त असून टँकरचा तात्काळ वापर न झाल्यास तो खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर टँकरवर त्याचा उदरनिर्वाह अवलंबून असल्याने तो त्यास सामान्य अटीवर परत करण्यात यावा. तसेच बेस ऑईल ७ ऑनचा साठा हा मे. अपार इंडस्ट्रिज यांना परत करण्यास त्यांची काहीही हरकत नाही, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २७/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित टँकर क्र. एमएच-०४-डीके-६३७० चे चालक अब्दुल साजिद यांनी युक्तीवाद केला की, तो टँकर क्र. एमएच-०४-डीके-६३७० चा चालक असून सदर टँकर चालवित असतो. दिनांक २८/११/२०११ रोजी गोदीमधून गाडी भरुन रबाळे (अपार) येथे चाललो होतो. त्याने चुकून २ कॅन माल चोरी केला होता. तो माल त्याने त्याच्या मर्जीने काढला होता. त्याबाबत त्याच्या मालकास काहीही माहिती नव्हती. त्यात त्याच्या मालकाचा काहीही दोष नाही. कृपया त्याला क्षमा करावे, अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २७/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस समक्ष उपस्थित राहून टँकर क्र. एमएच-०४-डीके-६३७० चे चालक अब्दुल साजिद तसेच मुर्तूजा रमजान अली शेख यांनी दिलेल्या लेखी जबाबात असे नमूद केले आहे की, दिनांक २८/११/२०१२ रोजी टँकर क्र. एमएच-०४-डीके-६३७० चे चालक अब्दुल साजिद नमूद टँकरमध्ये बेस ऑईल डॉकमध्ये भरुन अपार इंडस्ट्रिज रबाळे येथे पोहोच करण्यासाठी भरले होते. सदर टँकर श्री. मनोज वाल्मीकी यांच्या मालकीचा असून त्यांना श्री. अरविंद रामजी शहा या वाहतुकदाराने सांगितल्यानुसार सदरचा बेस ऑईल भरला आहे. सदर टँकर अब्दुल साजिद याने डॉकमधून दुपारी २.०० वाजता भरुन निघाला असता नेहमी प्रमाणे तो घटनास्थळी पोहचला व मुर्तूजा रमजान अली शेख याची भेट घेऊन सदर टँकरमधुन त्यांना बेस ऑईल काढून घेण्यास परवानगी दिली. त्यानुसार त्याच्या संमतीने मुर्तजा अली रमजान शेख यांनी ३५ लिटर क्षमतेच्या दोन

कॅनमध्ये एकूण ७० लिटर बेस ऑईल काढले व त्याचा मोबदला म्हणून अब्दुल साजिद यास एकूण ८०० रुपये दिले आहे. सदरचा साठा मुर्तजा अली शेख नेहमी प्रमाणे येणाऱ्या टँकरमधून बेस ऑईलचा साठा काढून ते सायकलवाल्यांना अनधिकृतपणे विक्री करीत असतात.

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक २८/११/२०११ रोजी या कार्यालयाच्या फिरते पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी वरिष्ठ पोलिस निरिक्षक, शिवडी पोलिस ठाणे यांच्या अधिपत्त्याखालील पथकासमवेत संयुक्तरित्या शिवडी गाडी अड्डा इलेक्ट्रीक पोल क्रमांक एस.एम.ए. १० येथे धाड टाकून टँकर क्र. एमएच-०४-डीके-६३७० या टँकरमधून उपस्थित इसमांनी ३५ लि. क्षमतेचे दोन कॅनमध्ये नमूद टँकरमधन पेट्रोलियम सदृश्य पदार्थ भरुन घेतले असता व तिसऱ्या कॅनमध्ये पेट्रोलजन्य पदार्थ भरत असतांना पथकातील अधिकाऱ्यांनी पंचासमवेत एका इसमास रंगेहाथ पकडून सदर टँकर, 7 ON Base Oil, सायकल व इतर मुद्देमाल जप्त करुन संबंधितांविरुध्द गुन्हा नोंद केला आहे.

मे. अपार इंडस्ट्रिजचे आयात व्यवस्थापक श्री. सी. पिंटो यांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, ते रबाळे नवी मुंबई स्थित फॅक्टरीमध्ये वापर करण्याकरिता बेस आईल ७ हा साठा परदेशातून आयात केले असल्याचे सांगून त्याकरिता कंपनीच्या वतीने मे. कैनाझ असोसिएट यांना डॉक्समधून साठ्याचे क्लिअरिंग तसेच सदर साठा हा उपभोक्त्यांकडे वितरण करण्याकरिता वाहतूकदार म्हणून नेमल्याचे नमूद केले आहे. माहे नोव्हेंबर २०११ मध्ये त्यांच्या कंपनीने आयात केलेला बेस ऑईल ७ चा साठ्याची आवक दिनांक २८/११/२०११ रोजी डॉकमध्ये झाली. पूर्वी नमूद केल्याप्रमाणे त्यांनी मे. कैनाझ असोसिएट यांना सदर कार्गोचे क्लिअरिंग आणि वाहतूक करुन त्यांच्या रबाळे येथील फॅक्टरीमध्ये आणण्याकरिता निर्देशित केले होते. आयात केलेला साठा त्यांच्या फॅक्टरीवर न पोहचल्याने त्यांनी चौकशी केली असता, नमूद टँकर हा आयात केलेल्या साठ्यासहित संबंधित प्राधिकरणाने टँकरचा चालक हा अनधिकृतरित्या त्यामधील साठा काढीत असल्याच्या सबबीवरुन जप्त केला असल्याचे आढळून आले. सदर टँकरचा चालक अथवा टँकरचा मालक अथवा सब कॉन्ट्रॅक्टर यांना वाहतूकीस नेमले असल्याने त्यांच्या चालकाकडून करण्यात आलेल्या गुन्ह्यामध्ये त्यांच्या कंपनीचा काहीही संबंध नसल्याचे सांगून संबंधित प्राधिकरणाने

HEAD OFFICE MUMBAI

जप्त केलेला त्यांचा बेस ऑईल ७ ऑनचा साठा हा त्यांना सामान्य अटीवर परत करण्यात यावा, असे नमूद केले आहे. ६०८

प्रस्तूत गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला टँकर क्र. एमएच-०४-डीके-६३७० मधील ट्रान्सफॉर्मर ऑईल बेस स्टॉक ७ ऑनचा साठा हा मे. अपार इंडस्ट्रिज लि. यांनी त्यांच्या मालकीचा असल्याचे सांगून सदर साठ्याच्या पुराव्यादाखल त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ५२६२३३६ दिनांक २२/११/२०११ सादर केल्याचे आढळून आले आहे. सदर बिल ऑफ एन्ट्रीचे अवलोकन करता, मे. अपार इंडस्ट्रिज लि. यांनी ट्रान्सफॉर्मर ऑईल बेस स्टॉक ७ ऑनचा ४०० मे. टन साठा हा रिपब्लिक ऑफ कोरिया या देशातून बिल ऑफ लेडिंग क्र. ईएजी ०६८०५ एनएमएमबी ०७ बी दिनांक ०२/११/२०११ अन्वये आयात केल्याचे दिसून येते. त्याअनुषंगाने मे. अपार इंडस्ट्रिज यांनी आयात केलेल्या साठ्याचे वेसल रिपोर्ट, इन्स्पेक्शन रिपोर्ट, टँक मेजरमेंट व क्वालिटी सर्टिफिकेटच्या छायांकित प्रतिही सादर केल्या आहेत. तसेच संचालक, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांच्याकडून वाचावे क्र. ७ अन्वये प्राप्त झालेल्या अहवालात, This oils may be used as Transformer oil base stock असे नमूद केले आहे. यावरुन मे. अपार इंडस्ट्रिज लि. यांचा टँकर क्र. एमएच-०४-डीके-६३७० मधील जप्त करण्यात आलेला ट्रान्सफॉर्मर ऑईल बेस स्टॉक ७ ऑनचा साठा हा उपलब्ध केलेल्या आयात संबंधीच्या व इतर कागदपत्रांचे अवलोकन करता वैध असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. सबब, जप्त करण्यात आलेला टँकरमधील संपूर्ण ट्रान्सफॉर्मर ऑईल बेस स्टॉक ७ ऑनचा साठा हा मे. अपार इंडस्ट्रिज लि. या कंपनीस क्षतीपुर्ती बंधपत्र घेऊन परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी, मे. अपार इंडस्ट्रिज लि. यांचे वतीने केलेल्या खुलाशात, त्यांच्या कंपनीने मे कैनाझ असोसिएट यांची वाहतूकदार म्हणून नेमणूक केली असल्याचे सांगितले. तथापी, मे. कैनाझ असोसिएट या कंपनीने सदर कामी वाहतूकीसाठी कराररबध्द असताना त्यांनी परस्पर त्यांच्या स्तरावर बेजबाबदारपणे पुरेसे टँकर उपलब्ध नसल्याच्या सबबीवरुन विनाकारारनामा सब कॉन्ट्रॅक्टर म्हणून अरविंद रामजी शहा यांची नियुक्ती केल्याचे दिसून येते. यावरुन मे. कैनाझ असोसिएट या वाहतूकदाराने मे. अपार इंडस्ट्रिज लि. या कंपनीची विश्वासार्हता गमावल्याचे निष्पन्न होत आहे. तद्नंतर अरविंद रामजी शहा यांनी सदर साठ्याच्या वाहतूकीकरिता परस्पर त्यांच्या स्तरावर मनोज भगवानदास वाल्मिकी या टँकर मालकास प्राधिकृत केल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. जप्त करण्यात आलेल्या टँकर क्र. एमएच-०४-डीके-६३७० या टँकरचे मालक मनोज भगवानदास वाल्मिकी यांनी सुनावणीमध्ये केलेल्या खुलाशात, दिनांक २८/११/२०११ रोजी श्री. अरविंद रामजी शहा यांनी मे. अपार इंडस्ट्रिज यांचा साठा

0010

टँकरद्वारे डॉक्समधून भरुन तो रबाळे येथे फॅक्टरीमध्ये पोहच करण्यासाठी त्यांची नेमणूक केल्याचे सांगून नमूद गुन्ह्यात टँकर मालक म्हणून त्यांना जबाबदार धरु नये. तसेच नमूद गुन्ह्यात त्यांचा प्रत्यक्ष सहभाग नसल्याचे सांगून त्यांचा चालक हा नियोजित ठिकाणी जाण्यासाठी मार्गस्त झाल्यानंतर त्यांचा चालकावर नियंत्रण राहत नाही, असा मोघम स्वरुपाचा खुलासा सादर करुन या कार्यालयाचा दिशाभूल करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. वास्तविक पाहता टँकर क्र. एमएच-०४-डीके-६३७० च्या चालकाने सदरचा साठा भरुन नियोजित ठिकाणी न जाता शिवडी गाडी अड्डा येथे घटनास्थळी जाऊन नमूद टँकरमधील बेस ऑईलचा साठा हा इतर इसमांच्या संगणमताने अनधिकृतरित्या काढीत असतांना पथकाने रंगेहात पकडले आहे. यासर्व घटनाक्रमाचे अवलोकन करता, वाहतूकदार कंपनी, सब कॉन्ट्रॅक्टर व टँकर मालक या सर्वांनी वाहतूकीची जबाबदारी पार पाडताना अक्षम्य निष्काळजीपणा दाखवून टँकर चालकास जबाबदार धरले आहे. जप्त टँकर क्र. एमएच-०४-डीके-६३७० मधील बेस ऑईलचा साठा प्रत्यक्षात उपभोक्त्यास न देता स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी गैरमार्गाने सदर टँकरमधील बेस ऑईलचा साठा टँकर चालकाने काढल्याचे आढळून आल्याने या गैरकृत्यास अप्रत्यक्षरित्या मे. कैनाझ असोसिएट, सब कॉन्ट्रॅक्टर व टँकर मालक हेहीं जबाबदार असल्याने त्यांनी उपभोक्ता तसेच पर्यायाने शासनाची फसवणूक केल्याचे सिध्द होत आहे. नमुद टँकरमधील भरण्यात आलेला बेस ऑईलचा साठा हा नियोजीत ठिकाणी व जसाच तसा वितरण करण्याची जबाबदारी वाहतूकदार व टँकरचे मालक यांची आहे. प्रस्तुत प्रकरणी टँकर मालकाच्या अपरोक्ष जरी चालक याने त्यांचे वाहनाचा गैरवापर केला असला तरी वाहन मालक या नात्याने त्यांनी त्यांचे वाहनाचा गैरवापर होणार नाही याची सर्वेतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. सबब जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदर टँकरच्या बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास टँकरचा मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा टँकर त्याच्या मालकास परत करण्याचा अथवा टँकरचे मालक तेवढी रक्कम भरण्यास तयार नसल्यास पोलिसांनी सदरचा टँकर जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी धाडीच्या वेळी घटनास्थळी आढळून आलेले सायकल, रिकामा ३५ लि. क्षमतेचा कॅन, लोखंडी टॅप, लोखंडी हूक इ. शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये शिवडी पोलिस

ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. १०९/२०११, दि.२८/११/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

## आदेश :-

१) प्रस्तूत प्रकरणी, जप्त करण्यात आलेल्या टँकरमधील संपुर्ण ट्रान्सफॉर्मर ऑईल बेस स्टॉक ७ ऑनचा साठा हा मे. अपार इंडस्ट्रिज लि. या कंपनीस पोलीसांनी क्षतीपुर्ती बंधपत्र घेऊन परत करावा.

२) जप्त करण्यात आलेला टँकर क्र. एमएच-०४-डीके-६३७० हा शासनजमा करण्यात येत आहे. सदर वाहनाच्या बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास वाहनाचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचे वाहन त्याच्या मालकास परत करण्यात यावे व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी वाहनाच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

३) अथवा वाहनाचे मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या वाहनाची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचे वाहन लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

४) जप्त करण्यात आलेले ३५ लि. क्षमतेच्या दोन ड्रममधील ७० लिटर पेट्रोलजन्य पदार्थाचा साठा हा शासनजमा करण्यात यावा. सदर साठ्याची पोलीसांनी सद्याच्या प्रचलित दरानुसार वैध परवानाधारकांस विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

५) घटनास्थळी जप्त करण्यात आलेली सायकल, ३५ लि. क्षमतेचे रिकामे ३ कॅन, लोखंडी टॅप, लोखंडी हूक इ. वस्तू शासनजमा करण्यात यावी. सदर वस्तूंची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food,

Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मुर्तूजा रमजान अली शेख

२) टँकर क्र. एमएच-०४-डीके-६३७० चे चालक

३) टँकर क्र. एमएच-०४-डीके-६३७० चे मालक

४) कैनाझ असोसिएट, पेट्रोलजन्य पदार्थांचा पुरवठादार

५) अपार इंडस्ट्रिज रबाळे यांचे मालक

६) अरविंद रामजी शहा
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शिवडी पोलिस ठाणे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, शिवडी पोलिस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल <u>विनाविलंब</u> या कार्यालयास सादर करावा.

२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

३) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव

४) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.